# वनशक्ती संस्थेतर्फे निसर्ग भ्रमंती

ठाणे (बातमीदार) : वनशक्ती या संस्थेतर्फे नुकतेच विनामूल्य निसर्ग भटकंतीचे मानपाडा येथील निसर्ग परिचय केंद्राच्या परिसरात करण्यात आले होते. या निसर्ग भटकंतीसाठी १७ नागरिकांनी सहभाग दर्शवला. या निसर्ग भटकंती निसर्ग वनस्पती वैविध्य, फुलपाखरे तसेच पक्ष्यांबद्दल माहिती सांगण्यात आली. सामान्य नागरिकांमध्ये निसर्गाबद्दल प्रबोधन निर्माण व्हावे हे या निसर्ग भटकंतीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे वनशक्तीचे प्रकल्प अधिकारी चित्रा म्हस्के आणि विकी पाटील यांनी सांगितले.